सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra
महाराष्ट्र गोसेवा आयोग
Maharashtra Goseva Ayog
पशुसंवर्धन आयुक्तालय Animal Husbandry Commissionerate
१ ला मजला, स्पायसर कॉलेजच्या समोर, औंध-खडकी रोड, औंध, पुणे - ४११०६७ 1st Floor, Opposite Spicer College, Aundh-Khadki Road, Aundh, Pune - 411067,
ई-मेल- mhgosevaayog@gmail.com कार्यालय फोन नं.- ०२० २९९५२६६५/२९९५०९०९

महाराष्ट्र गोसेवा आयोग संरक्षण, संगोपन, संवर्धन गावो रक्षति रक्षितः महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

---

जा. क्र. मगोसेआ / प्रती दिन प्रती गोवंश परीपोषण योजना/ प्र.क्र.६१ /१०२-१०३/२०२२५ पुणे-६७ दि. २०/०१/२०२५

प्रति,

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त (सर्व)

**विषय :- जिल्ह्यातील गोसेवा आयोगाकडील नोंदणीकृत गोशाळांमधील देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रति दिन प्रती पशू रु. ५०/- अनुदान योजना अंतर्गत ऑनलाइन अर्ज सादर करणेकरिता मुदतवाढ बाबत ..**

संदर्भ :- १. शा.नि. पविआ- ११२४/प्र.क्र. १८४/ पदुम-३ मुंबई-३२ दि. ०८/१०/२०२४

२. जा. क्र. मगोसेआ / प्रती दिन प्रती गोवंश परीपोषण योजना/ प्र.क्र.६१ /१५८७/२०२४ पुणेदि. १६/१२/२०२४

३. जा. क्र. मगोसेआ/प्रती दिन प्रती गोवंश परीपोषण योजना/ प्र.क्र.६१ /१७०३/२०२४/ पुणे दि. ३०/१२/२०२४

४. मा. मुख्यमंत्री कार्यालयातून प्राप्त संदेश व मा. अध्यक्ष गोसेवा आयोग यांचे प्राप्त निर्देश दि. २०/०१/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरून सदर शासन निर्णयानुसार गोशाळांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे करिता सन २०२४-२५ पासून गोशाळेत ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींना रु. ५०/- प्रति दिन प्रति गोवंश अनुदान देण्यासाठी योजना राबविण्यास मान्यता प्राप्त आहे. संदर्भीय शासन निर्णयाचे अवलोकन व्हावे. सदर योजने अंतर्गत अनुदान पात्रतेच्या अटी नुसार जिल्ह्यातील गोसंगोपनाचा किमान ३ वर्ष अनुभव असलेल्या, गोशाळेत किमान ५० गोवंश व संस्थेतील ईयर टॅगिंग (भारत पशुधन प्रणालीवर) असलेले तसेच गोसेवा आयोगाकडील नोंदणीकृत गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्थांमधील देशी गाई अनुदानास पात्र आहेत. संदर्भ २ अन्वये सदर योजना अंमलबजावणी बाबत वेळापत्रक व मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सदर योजने करिता ऑनलाइन अर्ज करणेची मुदत संदर्भ ३ अन्वये दिनांक ०५/०१/२०२५ पर्यंत वाढविण्यात आलेली होती. परंतु संदर्भ ४ अन्वये प्राप्त निर्देश नुसार ग्रामीण भागातील गोशाळा संचालकांना ऑनलाइन अर्ज भरतांना आलेल्या तांत्रिक अडचणी तसेच काही अपरिहार्य कारणांमुळे सदर योजना अंतर्गत अर्ज न करू शकलेल्या परंतु प्रत्यक्षात सदर योजनेचा लाभास पात्र असणाऱ्या गोशाळांना अर्ज करण्याकरिता पुनःश्च् संधि प्रदान करण्यात येत आहे.

तरी सदर शासन निर्णयामधील नमूद निकषानुसार पात्र गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्थांनी योजने करिता **ऑनलाइन अर्ज करणेची मुदत दिनांक २६/०१/२०२५ पर्यन्त वाढविण्यात येत आहे.** सदर योजनेचा उद्देश व स्वरूप, अनुदान पात्रतेच्या अटी व शर्ती, योजनेची अंमलबजावणी, तसेच योजनेचा ऑनलाइन अर्ज व त्यासोबत जोडावयाची अनुषंगिक कागदपत्रे इत्यादी बाबतची सविस्तर माहिती https://schemes.mahagosevaayog.org या संकेतस्थळावर तसेच यापूर्वी अर्ज केलेल्या परंतु त्रुटि पूर्तता करिता अर्जदारास परत पाठविण्यात आलेल्या गोशाळांची यादी त्रुटि पूर्तता करिता संकेतस्थळावरील **"त्रुटि असलेले अर्ज"** या मेनू वर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सदर योजने अंतर्गत सुधारित नियोजित वेळापत्रक खालील प्रमाणे आहे

| **अ. क्र.** | **बाब** | **पूर्वीचा कालावधी** | **सुधारित कालावधी** |
|---|---|---|---|
| १ | ऑनलाइन पद्धतीने अर्ज स्वीकारणे | १६/१२/२०२४ ते ०५/०१/२०२५ | **२१/०१/२०२५ ते २६/०१/२०२५** |
| २ | गोसेवा आयोग मार्फत प्राप्त अर्जाची प्राथमिक तपासणी | ०६/०१/२०२५ ते १०/०१/२०२५ | २७/०१/२०२५ ते ३१/०१/२०२५ |
| ३ | जिल्हा गोशाळा पडताळणी समिती द्वारा प्राथमिक तपासणी अंती पात्र गोशाळांची प्रत्यक्ष भेट व पडताळणी | ११/०१/२०२५ ते २०/०१/२०२५ | ११/०१/२०२५ ते २५/०१/२०२५ |
| ४ | जिल्हा गोशाळा पडताळणी समिति अहवालानुसार अनुदानास पात्र गोधनाची संख्या आयोग कार्यालयास कळविणे | २१/०१/२०२५ ते २५/०१/२०२५ | २५/०१/२०२५ ते ०५/०२/२०२५ |

संदर्भ २ अन्वये निर्गमित मार्गदर्शक सूचना अन्वये तसेच सदर शासन निर्णयातील नमूद अनुदान पात्रतेच्या अटींच्या अधीन राहून आपल्या जिल्ह्यातील गोसेवा आयोगाकडे नोंदणी कृत गोशाळांना सदर योजने अंतर्गत ऑनलाइन अर्ज सादर करणे बाबत सुधारित वेळा पत्रकानुसार आपल्या स्तरावरून आवाहन करण्यात यावे व उपरोक्त नमूद विहित कालमर्यादेत सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी.

तसेच गोसेवा आयोग कडून प्राथमिक तपासणी अंती पात्र गोशाळांची जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त स्तरावरून प्रत्यक्ष भेट व पडताळणी करीता निर्गमित **जिल्हानिहाय स्वतंत्र लॉगिन आयडी, पासवर्ड व User Manual नुसार पडताळणी प्रक्रिया सुरू ठेवावी.**

आपल्या जिल्ह्यातील सर्व गोशाळांमधील पशुधनाची भारत पशुधन प्रणाली वर नोंदणी तातडीने करण्यात यावी. जिल्ह्यातील गोशाळांमधील देशी गोवंश भारत पशुधन प्रणाली वर नोंदणी अभावी आयोगाकडील योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

सहपत्रे:-

१) पडताळणी अहवाल प्रपत्र १ व २

**(डॉ. मंजूषा मोहन पुंडलीक)**
**सहआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव,**
**महाराष्ट्र गोसेवा आयोग, औंध, पुणे**

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१) मा. सचिव (पदुम), महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय मुंबई-३२

२) मा. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे

प्रत पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव:-

१) प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व)